# बदलत्या वातावरणानुसार बागेतील उपाययोजना



दोडा अवस्थेत गळ झाल्यामुळे पूर्ण मोकळा झालेला घड.

## द्राक्ष सल्ला

**डॉ. आर.जी. सोमकुंवर,**
**डॉ. अजयकुमार उपाध्याय**

सद्यःस्थितीत आकाश निरभ्र असून दिवसाच्या तापमानात थोड्याफार प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. मात्र रात्रीच्या तापमानात बऱ्यापैकी घट दिसून येत आहे. सध्या द्राक्ष बागा वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थांमध्ये आहेत. या बदलत्या वातावरणामुळे बागेत काही अडचणी दिसून येत आहेत. त्यासाठी परिस्थितीनुसार योग्य उपाययोजना करणे आवश्यक आहे.

### दोडा अवस्थेतील गळ होणे

बऱ्याचशा बागेत या वातावरणात घडातील दोडा अवस्थेत गळ होताना दिसून येते. काही ठिकाणी छाटणी झाल्यानंतर प्रीब्लूम अवस्थेतील द्राक्ष घडाच्या विकासात तापमानामध्ये अचानक बदल झाल्यामुळे ही समस्या उद्‌भवते. हलक्या जमिनीमध्ये ही परिस्थिती जास्त प्रमाणात दिसून येते. दाट कॅनॉपी असलेल्या बागेत कॅनॉपीच्या खालील भागातील पूर्ण घड खाली झालेला दिसून येईल. दाट कॅनॉपीमध्ये गर्दी झाल्यामुळे त्या ठिकाणी घडाच्या विकासास आवश्यक असलेल्या शरीरशास्त्रीय हालचालींचे संतुलन बिघडल्यासारखी परिस्थिती दिसून येते. काही परिस्थितीत घड पूर्ण खाली झालेला दिसेल. बऱ्याच ठिकाणी प्रीब्लूम अवस्थेतील बागेमध्ये गळ व्यवस्थित होण्यासाठी बागेला पाण्याचा ताण दिला जातो. मात्र हा ताण नेमका किती आवश्यक आहे याचा अंदाज नसतो. किंवा पाणी किती द्यावे म्हणजेच फुलोरा गळ व्यवस्थित होईल याची माहिती नसते. परंतु घडाचे थिनिंग व्यवस्थित व्हावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून पाण्यावर नियंत्रण ठेवले जाते. भारी जमिनीत पाणी धरून ठेवण्याची क्षमता जास्त असल्यामुळे वेलीच्या वाढीचा जोमदेखील तितक्याच प्रमाणात जास्त दिसतो. त्यामुळे घडाच्या देठाची पकड तशीच टिकून राहताना दिसेल. परंतु हलक्या जमिनीमध्ये पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी असल्यामुळे बागेला पाणी कमी दिल्यास वेलीला ताण बसेल. हा ताण फक्त वेलींच्या फुटीच्या वाढीवर बसतो असे नाही. तर या काळात वाढत असलेला घडा ज्याला 'सिंक' म्हणतो त्यावर जास्त प्रमाणात दाब पडतो. अशातच वेलीच्या शरीरशास्त्रीय हालचालींचा वेग कमी होतो व 'सोअर्स सिंक''चे संतुलन देखील बदलते. त्यामुळे बागेत ही परिस्थिती निर्माण होते. या परिस्थितीमुळे बागेत पूर्ण वर्षभर केलेली मेहनत वाया जाते. यासाठी काही महत्त्वाच्या उपाययोजना करणे गरजेचे आहे.

### उपाययोजना

- बागेत पाण्यावर नियंत्रण न ठेवता, बागेला आवश्यक तितके पाणी द्यावे. जमिनीनुसार किंवा वेलीच्या वाढीनुसार पाण्याची किती गरज आहे याची माहिती प्रत्येकाकडे नसेल, अशा परिस्थितीत जमीन वाफसा स्थितीत येईल तितकेच पाणी द्यावे. वाफसा परिस्थिती कशी असावी हे समजून घेणे सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. त्यासाठी ठिबकचे पाणी ज्याठिकाणी पडते त्याच्या पुढे साधारण २० ते २५ सेंमी खोल बोदामधील माती हाताने काढावी. या मातीचा गोळा करून तो साधारणपणे ५ फूट अंतरावर फेकावा. मातीचा गोळा तुटल्यास त्या बागेत पाण्याची गरज आहे असे समजावे. जर मातीचा गोळा तसाच राहिल्यास तर त्या दिवशी बागेत पाणी देण्याची आवश्यकता नसेल.
- फुटीचा शेंडा खुडून घ्यावा. बऱ्याचवेळा बागायतदार ८ दिवसांपूर्वी शेंडा पिंचिंग केल्याचे सांगतात. परंतु शेंडा पिंचिंग केल्याच्या २ ते ३ दिवसांनंतर वेलीच्या शरीरशास्त्रीय हालचालींमध्ये पुन्हा संतुलन निर्माण होते आणि पुन्हा बगल फुटी निघण्यास सुरुवात होते. प्रीब्लूम अवस्थेत एकदा शेंडा थांबविला, की पुन्हा बगल फुटी निघताना दिसून येतील. परंतु मणी सेटिंगनंतर ही परिस्थिती दिसणार नाही. म्हणून बागेत अशी परिस्थिती दिसल्यास किमान एका वेलीच्या ८ ते १० फुटींचा शेंडा मारून घ्यावा. एक पान काढले तरी चालेल किंवा वेलीच्या काडीला जखम केली तरी त्याचे चांगले परिणाम मिळू शकतील. पान १४ वर »

- कीडनाशकांच्या शिफारशी लेबल क्लेमप्राप्त किंवा जॉएंट ॲग्रेस्कोप्राप्त आहेत.
- फवारणीचे प्रमाण हाय व्हॉल्यूम फवारणी पंपासाठीचे आहे.
- खरेदीवेळी पक्के बिल घ्यावे.
- बॅन किंवा 'रेस्ट्रिक्टेड' आहे का पाहावे.
- लेबल क्लेम वाचावेत.
- पुरेशा ज्ञानाशिवाय रसायने एकमेकांत मिसळू नयेत.
- रसायनांचा गट तपासावा.
- पीएचआय, एमआरएल तपासावेत.
- पेरणी वा लागवडीपूर्वी संबंधित बियाणांवर कोणती बीजप्रक्रिया केलेली आहे, हे तपासूनच पुढील बीजप्रक्रिया करावी.

**- मधमाशी, मित्रकीटकांना हानिकारक कीडनाशकांचा वापर टाळावा.**
**- पीक फुलोरा अवस्था लक्षात घेऊन कीडनाशकांचा समंजस वापर करावा.**

